# उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली, यांचे कार्यालय

तर्टे प्लाझा, अनेक्स शीतल ,गांधीनगर,डोंबिवली (पूर्व) ता.कल्याण जिल्हा ठाणे.

जा.क्र.उपनि/डोंबिवली/बी-2/ना.आ/१२३८/सन२०२२

दिनांक:- २१ /०९/२०२२

प्रति,

श्री. क्रिष्णा लाड,मुख्यप्रवर्तक

**नियोजित " रुणवाल गार्डन टॉवर ३३ " को-ऑप हौसिंग सोसायटी लि.**

रुणवाल गार्डन टॉवर ३३ ,कल्याण शिळ रोड,

डोंबिवली (पूर्व) ता कल्याण, जि. ठाणे

**विषय :- नियो. " रुणवाल गार्डन टॉवर ३३ " को-ऑप हौसिंग सोसायटी लि, डोंबिवली (पूर्व) नाव राखुन ठेवून बँकेत खाते उघडण्यांस परवानगी मिळणेबाबत**

---

महोदय,

कृपया आपले लक्ष आपल्या दि.२०/०९/२०२२ च्या वरील विषयासंबंधीच्या पत्राकडे वेधण्यांत येउन आपणास कळविण्यांत येत आहे की आपल्या **नियोजित संस्थेचे " रुणवाल गार्डन टॉवर ३३ " को-ऑप हौसिंग सोसायटी लि.**डोंबिवली (पूर्व) ता कल्याण, जि. ठाणेअसे नाव राखुन ठेवण्यात येत असून आपणास नियोजित संस्थेच्या नावाने दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लि. शाखा **डोंबिवली** (पूर्व) या बॅंक शाखेत खाते उघडण्याची परवानगी खालील अटीवर देण्यात येत आहे.

1. नाव राखुन ठेवल्यापासून तीन महिन्यंचे आत संस्थेचे संपूर्ण नोंदणी प्रकरण या कार्यालयास सादर करावे.
2. राखून ठेवलेले नांव तीन महिन्यापर्यतच राहील.नोंदणी प्रकरण तीन महिन्यात न आल्यास नियोजित संस्थेचे नाव रदद समजण्यांत येईल.
3. तीन महिन्यांत नोंदणी प्रकरण सादर करणे शक्य नसल्यास संयुक्तिक कारणास्तव मुदतीत मुदतवाढीसाठी अर्ज करावा.
4. नियोजित संस्थेच्या नांवाने खाते मुख्यप्रवर्तक यांचे सहीने उघडण्यांत यावे.
5. नियोजित संस्थेच्या नावाने उघडलेल्या खात्यातील रक्कम त्यांनी संस्था नोंदणी होऊन संस्थेच्या नावाने कारभार सुरू होईपर्यंत नोंदणी अधिकाऱ्यांच्या पुर्व परवानगीशिवाय काढण्यांत येऊ नये.
6. नांव राखुन ठेवण्याच्या परवानगीच्या तीन महिन्याच्या कालावधीच्या आंत **मा.उपनिबंधक सहकारी संस्था डोंबिवली / मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,ठाणे** याचेकडे रितसर शासनाने निश्चित करून दिलेल्या अर्जासहित संस्थेचा नोंदणी प्रस्ताव दाखल करावा. काही अपरिहार्य कारणामुळे ठरवून दिलेल्या मुदतीच्या आत नोंदणी प्रस्ताव सादर करणे शक्य न झाल्यास नोंदणी प्रस्ताव करणेसाठी या कार्यालयाकडे मुदतवाढीचा अर्ज सादर करावा व (अट क्र.6 ही केवळ बिल्डर असहकार्य सदरातील प्रस्तावासाठी लागु राहील.)
7. यापुढे संपूर्ण पत्रव्यवहार आपण नियोजित संस्थेच्या नावानेच करावा.
8. नियोजित संस्थेस नांव राखुन ठेवून बँकेत खाते उघडण्यांत परवानगी दिली म्हणजे संस्था नोंदणी होईलच असे नाही याची नोंद घ्यावी.

उपनिबंधक सहकारी संस्था, डोंबिवली, ता. कल्याण, जि. ठाणे
सत्यमेव जयते

(दिनेश चंदेल)
उपनिबंधक
सहकारी संस्था,डोंबिवली

Scanned with CamScanner